दि. 24 /6 /2026

शैक्षणिक वर्ष 2026-27 शिष्यवृत्ती.

शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी सुभद्राबाई शिक्षण निधी, मुंबईकडे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच आर्थिक मदतीसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या संस्थांसाठी माहितीपत्रक.

- ही शिष्यवृत्ती केवळ रत्नागिरी किंवा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांसाठीच आहे.
- विद्यार्थी दहावी उत्तीर्ण होऊन सरकार मान्य अशा कोणत्याही अभ्यासक्रमात शिकत असला पाहिजे.
- विद्यार्थी आर्थिक दृष्ट्या गरजू असणे आवश्यक आहे.
- जात तसेच धर्म याबद्दल कोणतीही अट नाही.
- अर्ज करण्यासाठी किमान 60 टक्के गुण आवश्यक आहेत.
- शिष्यवृत्तीची रक्कम किमान 5000 रुपये आहे.
- शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन अर्ज भरायचा आहे त्यासाठी लिंक या पत्रकाच्या शेवटी दिली आहे. ही लिंक सर्व प्रकारच्या अर्जांसाठी आहे. तेथे स्टुडन्ट स्कॉलरशिप हा फॉर्म भरायचा आहे. त्यासाठी
  1. गुणपत्रक
  2. फी पावती अथवा बोनाफाईड सर्टिफिकेट
  3. शिधापत्रिका (रेशन कार्ड)
  4. कुटुंबातील कमावणाऱ्या सर्व व्यक्तींचा 2025-26 या वर्षातील उत्पन्न दाखला
  5. विद्यार्थी ज्या शाळेत शिकत होता त्या शाळेतील दोन शिक्षकांची स्व हस्ताक्षरातील शिफारस पत्रे. ही शिफारस पत्रे शाळेच्या लेटरहेडवर असली पाहिजेत व शेवटीशिक्षकाचे संपूर्ण नाव संपर्क क्रमांक व स्वाक्षरी असली पाहिजे. **ज्या विद्यार्थ्याला यापूर्वी शिष्यवृत्ती मिळाली आहे त्याच्यासाठी शिफारस पत्रे आवश्यक नाहीत. पण त्यांनी शिष्यवृत्ती मिळाल्याचे संस्थेचे प्रशस्तीपत्रक जोडणे बंधनकारक आहे.**

  ही सर्व कागदपत्रे pdf या प्रकारात लागतील.

- शैक्षणिक खर्च जास्त असेल तर अधिक रकमेची कर्जाऊ शिष्यवृत्ती मिळू शकते त्यासाठी स्टुडन्ट स्कॉलरशिप हा फॉर्म न भरता स्टुडन्ट लोन स्कॉलरशिप हा फॉर्म भरावा.

- विद्यार्थी अपंग असल्यास / विद्यार्थ्यांचे पालक सैन्यात आजी अथवा माजी असल्यास / विद्यार्थ्यांचे पालक शिक्षक आजी अथवा माजी असल्यास किंवा विद्यार्थी जिल्हास्तरीय खेळाडू असल्यास त्याची प्राधान्याने निवड होते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी तसा पुरावा दाखविणारी कागदपत्रे जोडावी (upload) लागतील.

- संस्था / शाळा / अंगणवाडी / वसतिगृह / वाचनालय यासाठी स्वतंत्र फॉर्म आहेत त्याप्रमाणे अर्ज करावा.

- अर्ज करण्याची शेवटची तारीख 30 सप्टेंबर 2026 ही आहे

- अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

- अर्जाची प्राथमिक छाननी झाल्यानंतर त्यात निवडलेल्या विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे, मुलाखतीची तारीख, वेळ व ठिकाण https://subhadrabaishikshannidhi.com या वेबसाईटवर 15 ऑक्टोबर 2026 नंतर लावली जाईल. विद्यार्थ्यांनी 15 ऑक्टोबर नंतर याकरिता दररोज वेबसाईट पहावी.

- मुलाखतीत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती त्यांच्या बँक खात्यात भरली जाईल. विद्यार्थ्याचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे व ते सक्रिय असणे देखील गरजेचे आहे.

- अर्ज भरताना बँकेच्या खात्याचा तपशील भरल्यानंतर रद्द केलेल्या धनादेशाचा (Cancelled Cheque) फोटो जोडावा (Upload).

- **मुलाखतीस गैरहजर राहिलेल्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद्द होईल.**

- संस्थेच्या धोरणानुसार सख्ख्या भावंडा पैकी एकाला शिष्यवृत्ती मिळू शकेल.

- शिष्यवृत्तीची यादी जाहीर झाल्यानंतर शिष्यवृत्ती न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी कृपया संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधू नये.

- ऑनलाइन अर्ज करण्यासाठी आवश्यक असणारी तांत्रिक माहिती पीडीएफ स्वरूपात दिलेली आहे. ती अर्ज भरण्याआधी जरूर पहावी.

- भरलेला अर्ज आणि सोबत जोडलेले कागदपत्र, तसेच हे माहितीपत्रक यांची एक प्रत स्वतःजवळ ठेवावी. मुलाखतीसाठी निवड झाल्यास मुलाखतीला येताना ती कागदपत्रे व त्यांच्या मूळ प्रती (Original Documents) सोबत आणाव्या.

- अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक 1 जुलै 2026 पासून सुरू होईल. अर्ज भरण्याकरिता खालील लिंक वापरावी.

https://apply.subhadrabaishikshannidhi.com